मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, पुणे यांच्या आस्थापनेवरील ४ अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. एमसीटी-२०१७/प्र.क्र.८९/परि-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १७ नोव्हेंबर, २०१७.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, गृह विभाग क्र.एमसीटी १२७४/२-XXXV,(TR), दिनांक २०.०९.१९७७
२) शासन निर्णय, गृह विभाग क्र.एमसीटी २०१७/प्र.क्र.८९/परि.५, दिनांक २८.०४.२०१७
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक १०.०२.२०१७
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक ०३.१०.२०१७

<u>प्रस्तावना :-</u>

मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, पुणे यांच्या आस्थापनेवर एकूण १३ पदे कार्यरत असून त्यामध्ये ९ स्थायी पदे व ४ अस्थायी पदे आहेत. सदर ४ अस्थायी पदांना संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०९.२०१६ ते ३०.०९.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर ४ अस्थायी पदांची मुदत दिनांक ३०.०९.२०१७ रोजी संपली असून सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, पुणे यांनी एकूण ४ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत शासनास विनंती केली आहे. सदर पदांना ०१.१०.२०१७ पासून पुढे मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, पुणे यांच्या आस्थापनेवरील खालील ४ अस्थायी पदांना दिनांक ०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर मुदतवाढ ही न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असलेले दावे त्वरीत निकाली काढणे, निकाली काढलेल्या दाव्यांचे माहे नोव्हेंबर, २०१७ अखेरचे विवरणपत्र शासनास सादर करणे तसेच मार्च २०१७ रोजी प्रलंबित असलेल्या दाव्यातील ५० टक्के प्रलंबित दावे निकाली काढल्याचे दिसून न आल्यास पुढील मुदतवाढ मिळणार नाही, या अटीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदाचे नांव	पद संख्या	पदे निर्माण केलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक
१.	लिपिक-टंकलेखक	१	शा.नि.गृह विभाग क्र.एमसीटी/१८३/६(i)TRA-६, दि. १८.१०.१९८४
२.	टंकलेखक	१	शा.नि.गृह विभाग क्र.एमसीटी/१८३/६(i)TRA-६, दि. १८.१०.१९८४
३.	बेलिफ	१	शा.नि.गृह विभाग क्र.एमसीटी/१७८/३ TRA-६, दि. ०७.०८.१९८०
४.	शिपाई	१	शा.नि.गृह विभाग क्र.एमसीटी/१७८/३ TRA-६, दि. ०७.०८.१९८०
	एकूण पदे	**४**	

२. या बाबीवरील होणारा खर्च "मागणी क्र. बी-३, २०४१-वाहनांवरील कर, (००) ८००-इतर खर्च, (००) (०१) मोटार अपघात दावा न्यायाधिकरण (२०४१ ०१२५)" या लेखाशिर्षाखालील सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१११७१६०८४२०८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Kranti B. Patil

Digitally signed by Kranti B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ff9761db1faa1460e27b4ede45ea06864712590bd05d7ff12b360f63975c0187, cn=Kranti B. Patil
Date: 2017.11.17 16:12:29 +05'30'

(क्रांती पाटील)

कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रति,

१) जिल्हा व सत्र न्यायाधिश, पुणे.
२) सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, पुणे.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
५) वित्त विभाग (व्यय-८/ वित्तीय सुधारणा/आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई.
६) अवर सचिव, (बीयुडी-१/ परिवहन-४), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड नस्ती / परिवहन-५.